जि.प. वर्धा संकेतस्थळावर प्रसिद्धी

# जिल्हा परिषद, वर्धा
कार्यालय : सामान्य प्रशासन विभाग,
सिव्हील लाईन, वर्धा- 442001

दुरध्वनी क्र. 07152-243211/ 243889

ई-मेल :- dyceogenzpwardha@gmail.com

**क्र.जिपव/साप्रवि/आस्था-1/प्र.क्र.08/2026 वशि-459 /2026 E-mail द्वारे**

**दिनांक :- 06 मे,2026**

08/05/2026

**अत्यंत महत्त्वाचे /प्रथम प्राधान्य/कालमर्यादा :**

**जनगणना-2026 च्या अनुषंगाने जिल्हा परिषद,वर्धा अंतर्गत (सर्व विभाग) नियुक्त नसलेल्या संवर्गातील जिल्हास्तरीय बदल्यांचे वेळापत्रक-2026...**

**प्रति,**

1.खाते प्रमुख / विभाग प्रमुख (सर्व)
जिल्हा परिषद,वर्धा

2.गट विकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व)
जिल्हा वर्धा

**विषय : जिल्हा परिषद गट-क (वर्ग-3) व गट-ड (वर्ग-4) कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या सन-2026 (जिल्हास्तरीय बदल्यांचे वेळापत्रक (समुपदेशनाद्वारे प्रशासकीय,विनंती व तालुकानिहाय रिक्त पदांची स्थितीपाहुन समानिकरणाअंतर्गत) बदली प्रक्रिया राबविणेबाबत.)**

**संदर्भ** :1.ग्राम विकास विभाग,शासन निर्णय क्र.जिपब-414/प्र.क्र.122/आस्था-14,दिनांक 15 मे,2014
2.ग्राम विकास विभाग,शासन पुरकपत्र क्र.जिपब-4817/प्र.क्र.228/आस्था-14,दिनांक 07 मार्च,2019
3.या कार्यालयाचे परिपत्रक क्र.जिपव/साप्रवि/आस्था-01/प्र.क्र08/2026 वशि-70/2026 दि.10.01.2026.
4.उपसचिव महा.शा.ग्रामविकास विभाग यांचे पत्र क्रमांक,संकीर्ण-1526/प्र.क्र.83/आस्था-14दि 17 एप्रील,2026
5.या कार्यालयाचे पत्र क्र.जिपव/साप्रवि/आस्था-01/प्र.क्र 08/2026 वशि-277/2026 दि. 06 एप्रील,2026
6.या कार्यालयाचे पत्र क्र.जिपव/साप्रवि/आस्था-01/प्र.क्र 08/2026 वशि-395/2026 दि. 20 एप्रील,2026
7.या कार्यालयाचे पत्र क्र.जिपव/साप्रवि/आस्था-01/प्र.क्र 08/2026 वशि-431/2026 दि. 04 मे,2026

1. संदर्भ क्रमांक (01) चे शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही वेळीच होण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबतचे धोरण व कार्यपद्धती तसेच वेळापत्रक निश्चित करुन देण्यांत आलेले आहे. (शिक्षक संवर्ग वगळून)

2. संदर्भ क्रमांक (03) चे परिपत्रकान्वये शासन धोरणानुसार जिल्हा परिषद, वर्धा अंतर्गत बदल्यांचा कार्यक्रम निश्चित करण्यांत आलेला आहे. तसेच सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 बाबत शासनाकडून वेळोवेळी प्राप्त शासन निर्णय,शासन शुद्धपत्रक व शासन पत्र इत्यादी नुसार जिल्हा परिषद,कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत प्रारुप नियमावली प्रसिद्ध करण्यांत आलेली आहे. (जिल्हा परिषद,वर्धा संकेतस्थळ तसेच कार्यालयीन ई-मेल द्वारे).

3. ग्राम विकास विभागाचे संदर्भ क्रमांक (04) दिनांक 17 एप्रील,2026 चे पत्रातील निर्देशानुसार जनगणनेच्या कामाशी संबंधित जिल्हा परिषदेतील गट-क व गट-ड संवर्गातील (जिल्हा परिषदांमधील सर्व शिक्षकांसह) कर्मचाऱ्यांची सन-2026 ची सर्वसाधारण बदली प्रक्रिया राबविण्यांत येऊ नये असे निर्देश प्राप्त आहे.

स.प्र.वि. जिल्हा परिषद वर्धा

4. सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 जिल्हास्तरावर राबविणेकरीता संदर्भिय पत्र दिनांक 17.04.2026 मधील प्राप्त निर्देश तसेच शासनाकडून प्राप्त भ्रमणध्वनी संदेशानुसार संदर्भ क्रमांक (07) अन्वये आपले अधिनस्त संवर्गातील जनगणना-2026 चे कामाकरीता नियुक्त कर्मचारी यांची माहिती मागविण्यांत आली होती. त्याअनुषंगाने खातेप्रमुख/गट विकास अधिकारी,पंचायत समिती यांचेकडील प्राप्त माहितीनुसार जनगणना-2026 च्या कामाशी खालील संवर्गातील कर्मचारी नियुक्त करण्यांत आली असुन काही संवर्गातील कर्मचारी यांचे ऑनलाईन प्रशिक्षण झाले असुन अद्याप आदेश पारीत होणे बाकी आहे. करीता खालील नमुद विभागातील संवर्ग हे सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 मधून वगळण्यांत येत आहे.

**भारतीय जनगणना अधिनियम-1948 अन्वये जनगणना-2027 च्या पहिल्या टप्प्यातील कामाकरीता खालील संवर्गातील कर्मचारी नियुक्त असल्याने सार्वत्रिक बदली सन-2026 मधून वगळण्यांत येत असलेल्या विभागनिहाय संवर्गाची नावे.**

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | शेरा |
|---|---|---|
| I | **सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,वर्धा** | |
| 01 | विस्तार अधिकारी (साख्यिकी) | Superviser for Census-2027 (Houselisting and Housing Census) |
| 02 | कनिष्ठ सहाय्यक | Praganak in 2027 |
| II | **वित्त विभाग,जिल्हा परिषद, वर्धा** | |
| 03 | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | Praganak in 2027 |
| III | **कृषी विभाग, जिल्हा परिषद,वर्धा** | |
| 04 | विस्तार अधिकारी (कृषी) | Superviser for Census-2027 (Houselisting and Housing Census) |
| IV | **बांधकाम विभाग, जिल्हा परिषद,वर्धा** | |
| 05 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम | Superviser for Census-2027 (Houselisting and Housing Census) |
| VI | **शिक्षण विभाग, जिल्हा परिषद,वर्धा** | |
| 06 | विस्तार अधिकारी (शिक्षण) | Praganak in 2027 |
| 07 | केंद्र प्रमुख | Superviser for Census-2027 (Houselisting and Housing Census) |
| VII | **पंचायत विभाग, जिल्हा परिषद,वर्धा** | |
| 08 | ग्रामपंचायत अधिकारी | Praganak in 2027 |
| 09 | विस्तार अधिकारी (पंचायत) | प्रशासकीय बदली करीता पात्र कर्मचारी नसुन विनंती बदली करीता अर्ज प्राप्त नाही करीता बदली प्रक्रिया निरंक |

तसेच जनगणनेच्या कामकाजाशी संबंधित नसलेले इतर संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत संदर्भिय शासन निर्णयातील वेळापत्रकाप्रमाणे जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय सर्वसाधारण बदली प्रक्रिया राबविणेबाबत सर्व संबंधितांनी आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करावी.त्याच प्रमाणे वर नमुद संवर्गाव्यतिरीक्त इतर संवर्गातील जनगणनेच्या कामाकरीता (Regarding arranging training (जनगणना-2026-27 प्रशिक्षणाची व्यवस्था करणेबाबत कामकाज वगळून) कर्मचारी नियुक्त करण्यांत आले असतील व अशा संवर्गातील माहिती समुपदेशनाचे वेळेस निदर्शनास आल्यास सर्वसाधारण बदली सन-2026 बाबत वेळेवर निर्णय घेण्यांत येईल.

करीता सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे जिल्हा परिषद,वर्धा अंतर्गत गट-क (वर्ग-3) व गट-ड (वर्ग-4) कर्मचाऱ्यांच्या सन-2025-2026 च्या सार्वत्रिक बदल्या समुपदेशनाने करण्यासाठी खालील प्रमाणे विभागनिहाय समुपदेशनाची (प्रशासकीय/विनंती/समानिकरण) बाबत तारीख व वेळ निश्चित करण्यांत आलेली आहे. त्यानुसार सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 चे वेळापत्रकानुसार दिनांक 13 मे,2026 रोजी संदर्भ क्रमांक (06) मध्ये नमुद सुचनेनूसार स्व.सिंधुताई सपकाळ सभागृह, जिल्हा परिषद,वर्धा येथे उपस्थित राहावे.

त्याअनुषंगाने संदर्भिय शासन निर्णय विचारात घेता वेळापत्रकात नमुद संवर्गाचे अंतिम वास्तव्य ज्येष्ठता प्रसिद्ध करावयाच्या असुन अंतरिम वास्तव्य ज्येष्ठता यादी कर्मचारी यांचे बदली बाबत आलेल्या अर्जानुसार नोंदी घेऊन सर्व खातेप्रमुख यांनी वास्तव्य सेवाजेष्ठता प्रसिध्द करणे, आक्षेप मागविणे व त्यांचे निराकरण करणे बाबत कार्यवाही पार पाडावी. सन-2026 मध्ये खालील प्रमाणे सार्वत्रिक बदल्या करण्यात येईल.

**सार्वत्रिक बदल्या सन-2026 मधील बदल्यांचा प्राधान्यक्रम खालील प्रमाणे राहील.**

1. प्रथम प्रशासकीय बदल्या करण्यात येईल. (समानिकरण प्रक्रिया प्रशासकीय बदलीस लागु होणार नाही.)
2. नंतर विनंती बदल्या. (रिक्त पदांचा समतोल साधण्यांत येऊन विनंती बदली मान्य/अमान्य बाबत निर्णय घेण्यांत येईल.) तदनंतर उर्वरीत तालुक्यातील समतोल राखण्यासाठी शासन निर्णय दिनांक 15 मे,2014 प्रकरण-2 जिल्हास्तरीय बदल्या मधील मुद्या क्र.3 मधील 3 (अ) मधील (3) नुसार समानीकरणाची /रिक्त पदांचा समतोल राखणेबाबत प्रक्रीया राबविण्यात येईल.
3. तसेच जिल्हा परिषद अंतर्गत विविध संवर्गातील बदली प्रक्रीया राबविण्याबाबतचे सुचना/कार्यक्रम या आधीच या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक (06) अन्वये देण्यांत आल्या आहेत. सार्वत्रिक बदल्या सन-2026 चे बदल्यांबाबतची संपुर्ण माहिती बदली प्रक्रीयेच्या वेळी पेन ड्रॉईव्ह मध्ये आणावी.
4. समानीकरणाची प्रक्रीया राबविण्यांत येणार असल्याने बदल्याच्या वेळी अंतिम वास्तव्य ज्येष्ठता यादीमध्ये ज्या कर्मचाऱ्यांच्या समोर (*) स्टॅार अशी खूण दर्शविण्यांत आलेली आहे अशा कर्मचारी यांनी बदली प्रक्रियेस उपस्थित राहणे अनिवार्य आहे. जे कर्मचारी उपस्थित राहणार नाही अशावेळी प्रशासकीय दृष्टीने रिक्त पदे विचारात घेवून ज्येष्ठता प्रमाणे रिक्ततेनूसार त्यांना पदस्थापना दिली जाईल. अशा प्रकारे समानीकरण प्रक्रीया राबविल्या जाईल.

तरी जिल्हा परिषद, वर्धा अंतर्गत गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांच्या सन-2026 च्या सर्वसाधारण बदल्या व रिक्त पदांचा समतोल साधण्यासाठी समानिकरणाची प्रक्रीया समुपदेशनाने करण्यासाठी खालील प्रमाणे विभागनिहाय समुपदेशनाची तारीख व वेळ निश्चित करण्यांत आलेली आहे. तरी समुपदेशनाचे वेळी उपस्थित राहावे ही विनंती.

(शिक्का: सा.प्र.वि. जिल्हा परिषद वर्धा)

**समुपदेशनाचा कार्यक्रम (प्रशासकीय,विनंती बदल्या व समानीकरण**
**(विनंती बदली प्रक्रिया करतांना रिक्त पदांचा समतोल राखण्यांत येईल.(-)Short (+) Excess)**
**स्थळ : स्व.सिंधुताई सपकाळ सभागृह, जिल्हा परिषद,वर्धा**
दिनांक :13 मे,2026 (बुधवार)

**(ग्राम विकास विभाग शासन शुद्धीपत्रक क्रमांक:जिपब-1125/प्र.क्र.125/आस्था-14 दिनांक 23 मे,2025 मध्ये समाविष्ट करण्यांत आलेल्या टक्केवारीनुसार % प्रशासकीय बदली बाबत कार्यवाही करावी.)**

| अ.क्र. | विभागाचे नांव | पदाचे नांव | समुपदेशनाचा दिनांक / वेळ प्रशासकीय व विनंती बदल्या सकाळ/दुपारी |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | सामान्य प्रशासन,विभाग,<br>जिल्हा परिषद,वर्धा | 1)सहाय्यक प्रशासन अधिकारी<br>2)कनिष्ठ प्रशासन अधिकारी<br>3)वरिष्ठ सहाय्यक<br>4)वाहन चालक<br>5)परिचर | सकाळी 11:00 ते 12.00 |
| 2 | बांधकाम विभाग,<br>जिल्हा परिषद,वर्धा | 1)स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | दुपारी 12.00 ते 12.30 |
| 3. | वित्त विभाग,<br>जिल्हा परिषद, वर्धा | 1)सहा.लेखा अधिकारी<br>2)कनिष्ठ लेखा अधिकारी<br>3)वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | दुपारी 12.30 ते 1.00 |
| 4. | पशुसंवर्धन विभाग,<br>जिल्हा परिषद,वर्धा | 1)सहाय्यक पशुधन विकास अधिकारी<br>2)पशुधन पर्यवेक्षक<br>3)पट्टीबंधक | दुपारी 1.00 ते 1.30 |
| 5. | आरोग्य विभाग,<br>जिल्हा परिषद,वर्धा | 1)आरोग्य पर्यवेक्षक<br>2)आरोग्य सहाय्यक (पुरुष/महिला)<br>3)आरोग्य सेवक (पुरुष /महिला)<br>4)औषधनिर्माण अधिकारी | दुपारी 03.00 ते 4.00 |

**प्रशासकीय बदली प्रक्रिया झालेनंतर विनंती बदल्या करतांना विभाग/पंचायत समिती स्तरावरील (-) Short (+) Excess) रिक्त पदांचा समतोल बघुन विनंती बदली बाबत निर्णय घेण्यांत येईल तद्नंतर आपसी विनंती बदली प्रक्रिया राबविण्यांत येईल.**

टिप :

1.जे कर्मचारी समुपदेशनाच्या अगोदर लेखी विकल्प देणार नाहीत वा समुपदेशनाला उपस्थित राहणार नाहीत किंवा उपस्थित राहुनही विकल्प देणार नाहीत त्या बदलीपात्र कर्मचाऱ्यांना त्यांचा क्रमांक आल्यावर त्यावेळी सर्वाधिक रिक्त पदे असणाऱ्या तालुक्यात माझे अधिकारान्वये शासन धोरण विचारात घेऊन बदलीने पदस्थापना देण्यांत येईल.

2.बदली प्रक्रिया ही कर्मचारी यांचे समक्ष प्रोजेक्टरवर रिक्त पदे दर्शविण्यांत येत असुन त्यानुसार समुपदेशनाद्वारे बदली प्रक्रिया केली जात असल्याने रिक्त पदे,तालुक्यातील रिक्त पदांचा समतोल व कार्यालयाची प्रशासकीय निकड या सर्व बाबी विचारात घेऊन बदली ने कर्मचारी यांचे मागणीनुसार पदस्थापना देण्यात येत असल्याने समुपदेशनानंतर पदस्थापनेत कुठलाही बदल होणार नाही याची नोंद घ्यावी त्याचप्रमाणे बदली आदेश समुपदेशनानंतर लगेच निर्गमित करण्यांत यावे.

जिल्हा परिषद वर्धा

3. विभागप्रमुख यांनी अधिपत्याखालील बदलीस पात्र कर्मचाऱ्यांना वेळापत्रकानुसार समुपदेशनाकरीता जिल्हा परिषद,वर्धा सभागृह येथे उपस्थित राहण्याबाबत आपले स्तरावरुन सुचित करावे. तसेच रिक्त पदांची स्थिती समुपदेशनाचे किमान दोन दिवस अगोदर सुचना फलकावर तसेच जिल्हा परिषदेच्या संकेत स्थळावर दर्शविण्यात यावी. *बदली पात्र/सुट पात्र तसेच समानिकरणास पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांना समुपदेशनाकरीता बदलीचे वेळापत्रकानुसार जिल्हा परिषद, वर्धा* येथे उपस्थित राहण्याबाबत आपले स्तरावरुन सुचित करण्यांत यावे. त्याच प्रमाणे आवश्यक ती पुरक कागदपत्रे,विकल्पाचा नमुना, रिक्त पदांची सद्यस्थिती व बदली आदेश नमुना अद्यायावत ठेवावे.

4. तसेच तालुकांतर्गत बदल्या करतांना गट विकास अधिकारी यांनी शासन निर्णय दिनांक 15 मे,2014 नमुद वेळापत्रकानुसार तसेच प्रकरण-03 मध्ये नमुद पंचायत समिती क्षेत्राअंतर्गत गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत कार्यवाही करावी तसेच बदली प्रक्रिया करतांना प्रकरण-03 (01) मध्ये नमुद संवर्गातीलच प्रशासकीय/विनंती बदली बाबत कार्यवाही करावी इतर संवर्गातील बदली प्रक्रिया ही तालुकास्तरावर करण्यांत येऊ नये. सदर बदली प्रक्रिया शासन धोरणानुसार दिलेल्या कालावधीतच करावी.

5. सामान्य प्रशासन विभागाकडे जनगणना-2026 च्या कामाकरीता नियुक्त संवर्गातील प्राप्त माहितीवरुन सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 बाबत वेळापत्रक तयार करण्यांत आले आहे. त्याचप्रमाणे काही विभागातील संवर्ग हे जनगणनेच्या कामाकरीता नियुक्त नसुन सुद्धा प्रशासकीय बदली निरंक व विनंती बदली करीता अर्ज प्राप्त झालेले नाही असे विभाग सदर वेळापत्रकातून वगळण्यांत आलेले आहे.( उदा. महिला व बाल कल्याण विभाग, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, लघुपाटबंधारे विभाग, पंचायत विभागांतर्गत विस्तार अधिकारी (पंचायत) इत्यादी) करीता खातेप्रमुख यांनी वेळापत्रकात दर्शविण्यांत आलेल्या संवर्गातील सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 बाबत कार्यवाही करणेकरीता रिक्त पदांची अचुक सद्यस्थिती समुपदेशना प्रक्रियेसाठी प्रोजेक्टवर दर्शविण्यासाठी अद्यावत ठेवावी. (Soft Copy व Hard Copy) सह.

6.जिल्हास्तरीय बदली प्रक्रिया झालेनंतर दिनांक 15 मे,2014 च्या शासन निर्णयातील परिशिष्ट-2 (अ) व तालुकास्तरीय बदली प्रक्रिया झाल्यानंतर परिशिष्ट 2 (ब) नुसार सदरची माहिती त्याच दिवशी तात्काळ भरुन स्वाक्षरीची प्रत सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,वर्धा येथे सादर करावी.

Parag Soman.

(पराग सोमण,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, वर्धा

मा. मु. का. अ. जिल्हा परिषद वर्धा

**प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव :**

1.मा.विभागीय आयुक्त,नागपूर विभाग, नागपूर माहितीस्तव सविनय सादर.
2.मा.जिल्हाधिकारी,वर्धा माहितीस्तव सविनय सादर.
3.अपर आयुक्त (आस्थापना),नागपूर विभाग,नागपूर.
4. अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा.
5.प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा,वर्धा.
6.रोखपाल सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,वर्धा बदली प्रक्रिया पारदर्शक होण्याचे दृष्टीने आपण वेळापत्रकानुसार समुपदेशन व संपुर्ण बदली प्रक्रियेचे व्हिडीओ रेकार्डीग व प्रोजेक्टर बाबत कार्यवाही करावी.
7.आस्थापना-02,सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद,वर्धा यांनी आपले अधिनस्त वर्ग-4 मधील पुरेसे कर्मचारी यांची बदली वेळापत्रकानुसार जिल्हा परिषद,सभागृह वर्धा येथे उपस्थित राहणेबाबत आपले स्तरावरुन आदेशित करावे.
8.कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद,वर्धा यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

श्री.नखाते व श्री.दिनेश वानखडे, वायरमन (तारतंत्री) बांधकाम विभाग, जिल्हा परिषद,वर्धा यांना वेळापत्रकात नमुद तारिख व वेळेनुसार जिल्हा परिषद,वर्धा येथील सभागृहात विद्युत व साऊंड सिस्टीम व्यवस्थेकरीता उपस्थित राहणेबाबत आपले स्तरावरुन सुचित करावे.

Parag Soman.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, वर्धा